<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

<u>**महापालिका सर्वसाधारण सभा**</u>

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 20/04/2016 रोजी भरलेल्या माहे एप्रिल महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

<table>
<tr>
<td>विषय क्र. 01.<br>दिनांक 20 एप्रिल 2016</td>
<td>(अ) महापालिका सचिव यांजकडून मा. महापौर यांस आलेले दिनांक 29/03/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मस/467/2016 :-<br>"महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 20 (3) व (4) अन्वये, स्थायी समितीचे खालील आठ सदस्य, दिनांक 01 मे 2016 रोजी मध्यान्ही निवृत्त होतील :-
<table>
<tr><td>1)</td><td>श्री. सुरेश शिवाजी कुलकर्णी,</td><td>2)</td><td>श्री. रविंद्र उध्दव इथापे,</td></tr>
<tr><td>3)</td><td>श्री. शंकर किसन मोरे,</td><td>4)</td><td>श्री. शशिकांत हंबीरराव राऊत,</td></tr>
<tr><td>5)</td><td>श्रीम. नेत्रा आशिष शिर्के,</td><td>6)</td><td>श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर,</td></tr>
<tr><td>7)</td><td>श्रीम. रुपाली निशांत भगत,</td><td>8)</td><td>श्री. रामचंद्र बारशा घरत."</td></tr>
</table>
(ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 20(5) सह वाचावयाच्या कलम 31-अ (1)व(2) अन्वये, *नामनिर्देशनाद्वारे स्थायी समितीवर 8 सदस्यांची नियुक्ती करणे.</td>
</tr>
<tr>
<td>दिनांक 20 एप्रिल 2016</td>
<td>महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 20(5) सह वाचावयाच्या कलम 31-अ (1) व (2) अन्वये,<br>1. श्री. अशोक बाबूराव गुरखे,<br>2. श्रीम. शुभांगी ज्ञानेश्वर पाटील,<br>3. श्रीम. छाया केशव म्हात्रे,<br>4. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील,<br>5. श्रीम. संगीता अशोक पाटील,<br>6. श्री. प्रशांत धनाजी पाटील,<br>7. श्रीम. मिरा संजय पाटील,<br>8. श्री. दिपक रघुनाथ पवार.<br>वरील नामनिर्देशनाद्वारे स्थायी समितीवर 8 सदस्यांची नियुक्ती.</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय -</td>
<td><u>मंजूर</u></td>
</tr>
<tr>
<td>विषय क्र. 02.<br>दिनांक 20 एप्रिल 2016</td>
<td>महानगरपालिकेचे दिनांक 02 फेब्रुवारी 2016 भाग-II, 20 फेब्रुवारी 2016, 03 मार्च 2016 भाग-I व भाग-II, 04 मार्च 2016 रोजीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय -</td>
<td><u>इतिवृत्त कायम करण्यात आले</u></td>
</tr>
<tr>
<td>विषय क्र. 03.<br>दिनांक 20 एप्रिल 2016</td>
<td>प्रश्नोत्तरे</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय -</td>
<td><u>मंजूर</u></td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| **विषय क्र. 4.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | बेलापूर गाव ते आयकर कॉलनी जोडणा-या रेल्वे क्रॉसिंगवर पादचारी पुल (Footover bridge) बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./172/2016. |
| **<u>ठराव क्र. 1005.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "बेलापूर गाव ते आयकर कॉलनी जोडणा-या रेल्वे क्रॉसिंगवर पादचारी पुल (Footover bridge) बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 4 कोटी मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 5.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | नेरुळ से. 19(अे) येथील वंडरपार्क मधील हिरवळीची जागा वापराच्या शुल्काबाबतच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/173/2016. |
| **<u>ठराव क्र. 1006.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "नेरुळ से. 19 (अे) येथील वंडरपार्क मधील हिरवळीची जागा प्रत्येक कार्यक्रमाकरिता 10000 चौ.मी.क्षेत्र प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर शिबिरे, स्नेहसंमेलन, स्वागत समारंभ, लग्न समारंभ विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम इ. कार्यक्रमांसाठी प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह उपरोक्त अटी व शर्तीसह उपलब्ध करुन देण्यास व त्याकरिता प्रस्तावित केलेले शुल्क निश्चितीस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 6.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील किऑक्स/ दुकान-गाळे / कार्यालये 05 वर्षाकरीता परवानगी व अनुज्ञा (लिव्ह ॲन लायसन्स) तत्वावर देण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मालमत्ता/705/2016. |
| **<u>ठराव क्र. 1007.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील किऑक्स/दुकान-गाळे/कार्यालये प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह तक्ता क्र. 01 व 02 मधील नमुद व्यक्ती /संस्था यांनी स्तंभ क्र. 06 मध्ये भाडेदराची जास्तीत जास्त देकार रक्कम नमूद केली असल्यामुळे संबंधितास स्तंभ क्र. 06 मध्ये नमुद केलेल्या मासिक भाडेदराने 05 वर्षाच्या कालावधीकरीता प्रति वर्षी 10% भाडे वाढीसह भुखंड क्र. 71, 72 आणि 73, संक्टर 11, बेलापूर येथील पार्किंग व कफ़ेटेरियामधील किऑक्स (kiosk) क्र. 02, 03, 11, 15,18, 29, 30, 36, 38, 42 व भुखंड क्र. 160, सेक्टर 44, करावे येथील गाळा क्र. 06 "परवानगी व अनुज्ञा" (लिव्ह ॲन्ड लायसन्स) तत्वावर निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे देण्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 (क) अन्वये, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 7.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | महापालिका सचिव विभागाकरिता Risograph Digital Duplicator/Copy Printer मशिनसाठी इंक कार्टेज व मास्टर रोलचा पुरवठा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 21/03/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/मस/438/2016. |
| **<u>ठराव क्र. 1008.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "महापालिका सचिव विभागगकरिता Risograph Duplicator/copy Printer मशिन इंक कार्टेज व मास्टर रोलचा पुरवठा उपलब्ध करुन घेणेसाठी 02 वर्षासाठी दरकरार करणेसाठी निविदा मागवून प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींसह एकूण रक्कम रुपये 70 लाख इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 8.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता कार्यालयीन फर्निचर खरेदी करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/04/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/भांडार/1276/2016. |
| **<u>ठराव क्र. 1009.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "नवी मुंबई महानगरपालिकच्या विविध विभागांकरीता कार्यालयीन फर्निचर साहित्याच्या एकूण 35 बाबींच्या खरेदीसाठी 2 वर्षाच्या कालावधीकरीता दरकरार करणेसाठी निविदा मागवून प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी 17 लाख 82 हजार 460 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 9.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरिता कोरे स्टँडर्ड पेपर्स, फाईल कव्हर्स, लखोटे व इत्यादी साहित्य खरेदी करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/04/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/भांडार/1277/2016. |
| **<u>ठराव क्र. 1010.</u>**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "नवी मुंबई महानगरपालिकच्या विविध विभागांसाठी कोरे स्टँडर्ड पेपर्स, फाईल कव्हर्स,लखोटे व इतर साहित्य अशा एकूण 31 बाबींच्या खरेदीकरीता 2 वर्षाच्या कालावधीकरीता दरकरार करणेसाठी निविदा मागविण्यास व 2 वर्षाकरीता एकूण रक्कम रु. 1 कोटी 52 लाख मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | पामबीच रस्त्याजवळील गणपतशेठ तांडेल चौक ते जय मल्हार चौकापर्यंतच्या गटाराची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/04/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/शअ/281/2016. |
| **ठराव क्र. 1011.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "पामबीच रस्त्याजवळील गणपतशेठ तांडेल चौक ते जयमल्हार चौकापर्यंत सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी 40 लाख 29 हजार 691 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडी ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सन 2016-17 व सन 2017-18 मध्ये विद्यार्थी सुविधा पुरवठा करणे कामी प्रशासकिय मंजूरी मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 11/02/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/शि.वि. टे.क.06/259/2016. |
| **ठराव क्र. 1012.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "नमुंमपा शिक्षण विभाग अंतर्गत बालवाडी ते 8 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सन 2016-17 व सन 2017-18 मध्ये विद्यार्थी सुविधा पुरवठा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण अंदाजपत्रकिय रक्कम रु. 33 कोटी 70 लाख 20 हजार 759 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **तां.का. क्र. 14.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "Brics Friendship Cities Conclave 2016 च्या आयोजनाकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत. |
| **ठराव क्र. 1120.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2016** | "Brics Friendship Cities Conclave 2016 च्या आयोजनाकरिता रु. 30 लाख इतके अनुदान महाराष्ट्र शासनाच्या परवानगीस अधीन राहून देण्यास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 89 नुसार नवी मुंबई महानगरपालिका अर्थसंकल्पातील सन 2016-2017 क्रिडा व सांस्कृतिक विभागाकडील लेखाशिर्ष "क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमवारील खर्च" या मधून करणेस, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

## महानगरपालिकेने मंजूर / नामंजूर केलेल्या पाठविलेल्या ठरावांची यादी

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 80 मधील औद्योगिक डि ब्लॉक परिसरातील गटाराची अत्यंत दुरअवस्था झाली आहे. येणा-या पावसाळयात शेजारी असलेल्या डोंगराचे पाणी गटारामधुन न वाहता ते रस्त्यावर वाहणार आहे. त्याकरीता परिसरातील गटार व संरक्षण भिंत बांधणे. | 12<br>एप्रिल | 1013<br>20/04/2016 | मंजूर |
| 2. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-** नवी मुंबई महानगर पालिकातील सर्व शाळेमध्ये सी.सी.टि.व्हि. कमेरे बसविणे. | 13<br>एप्रिल | 1014<br>20/04/2016 | मंजूर |
| 3. | **श्रीम. कविता चंद्रकांत आगोंडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 80 मधील एल.पि. जक्शन ते प्लॉट नं. डि. 140 पासून ते डि. 178/04 पर्यंत रस्त्यांचे काँक्रिटीकरण व गटार बनविणे. | 14<br>एप्रिल | 1015<br>20/04/2016 | मंजूर |
| 4. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82, अंतर्गत शिरवणे स्मशानभूमीच्या बाहेर असलेला भूखंड हरीतपाट्याचे व सुशोभिकरण करुन स्थानिक नागरिकांना चांगल्या प्रकारचे उद्यान किंवा मद्यान उपलब्ध करणे. | 15<br>एप्रिल | 1016<br>20/04/2016 | मंजूर |
| 5. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82, जुईनगर सेक्टर 24 व 25 येथील रहिवाशांच्या सोयीसाठी प्रत्येक सोसायटीकडे जाणा-या रस्त्याला दिशादर्शक नामफलक उभारणे. | 16<br>एप्रिल | 1017<br>20/04/2016 | मंजूर |
| 6. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 82, जुईनगर येथील सेक्टर 24 मधील चिंचोली तलावाची कमान चांगल्या व अत्याधुनिक पध्दतीची उभारणे. | 17<br>एप्रिल | 1018<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 7. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मध्ये जो भुखंड पालिकेचा आहे त्या भुखंडावर अद्यवत प्रकारचे नागरी विरंगुळा केंद्र तयार करणे. | 18<br>एप्रिल | 1019<br>20/04/2016 | मंजूर |
| 8. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मध्ये सेक्टर 4 येथे सिडकोकालीन मलनि:स्सारण वाहिन्या आहेत त्या बदलणे. | 19<br>एप्रिल | 1020<br>20/04/2016 | मंजूर |
| 9. | **श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 84 मधील सेक्टर 4 मध्ये अद्यावत प्रकारचे शौचालय बांधणे. | 20<br>एप्रिल | 1021<br>20/04/2016 | मंजूर |
| 10. | **श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 11 साईनाथवाडी जयभवानी चाळीतील व परिसरातील एम.एस.ई.बी. च्या लाईन अंडरग्राऊंड करुन पोल हटविणे. | 21<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 11. | **श्री. राजू रामा कांबळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 11 साईनाथवाडी, छत्रपती कॉलनी व ऐरोली गांव येथील गटाराची दुरुस्ती करुन बंदिस्त करणे. | 22<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 12. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 14, से. 20 टोपाझ सोसायटीच्या बाजूला नवीन हायमास्ट बसविण्यात यावे. | 23<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 13. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 14, से. 20 एरोली मधील हायटेन्शन खालील उद्यान नव्याने विकसीत करण्यात यावे. | 24<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 14. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 14, से. 20 ऐरोली येथील स्मशानभुमीत चिमणी बसवून स्मशानभुमीची दुरुस्ती करण्यात यावी. | 25<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 15. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर येथे बॉबी चाळ, महालक्ष्मी चाळ ते बालीनगर, ओमकृपा चाळ येथील गटाराची दुरुस्ती करुन तेथे हेवीडयुटी गटार त्यावर स्लब टाकणे. | 26<br>एप्रिल | 1022<br>20/04/2016 | मंजूर |
| 16. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, मध्ये उत्तर भारतीय चाळ ते ईश्वरनगर मुख्य रस्त्यापर्यंत हेवीडयुटी गटार बांधणे. | 27<br>एप्रिल | 1023<br>20/04/2016 | मंजूर |
| 17. | **सौ. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-** प्रभाग क्र. 1, मध्ये ईश्वरनगर येथे अमृतधाम सोसायटी, माऊलीसदन चाळ व ईश्वरनगर ट्रॉन्सफार्मर जवळ या ठिकाणांवर चावडी बांधणे. | 28<br>एप्रिल | 1024<br>20/04/2016 | मंजूर |
| 18. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, जुईनगर मधील सोसायटयांचे भुखंड क्रमांक, नांव व पुर्ण जुईनगरचे नकाशे व रस्त्यांची नांवे असलेले रेडियमचे फलक रस्त्यांच्या कडेने बसवावे. | 29<br>एप्रिल | 1025<br>20/04/2016 | मंजूर |
| 19. | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, जुईनगर येथील मलनि:स्सारण वाहिन्या 12 वर्षापुर्वी टाकल्या होत्या त्या वेळेपासून आता बऱ्याच इमारती व लोकसंख्या वाढुन सांडपाणी व मलमुत्र यांची व्याप्ती वाढल्यामुळे बऱ्याचदा मलनि:स्सारण वाहिन्या तुंबुन रस्त्यावर घाण पाणी वाहून दुर्गंधी येते म्हणून सदर जुन्या मलनि:स्सारण वाहिन्या बदलून मोठया आकाराच्या वाहिन्या टाकणे. | 30<br>एप्रिल | 1026<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **20.** | **सौ. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 83, ला लागुन असलेल्या मोठया नाल्यात खारफुटी वाढल्याने त्याची साफसफाई होत नाही तरी नागरिकांच्या आरोग्याच्या हितासाठी व पुढे पामबीच पर्यंत रस्ता वाढविण्याच्या दृष्टीने नवीन मुंबईत खाडीच्या भागात विमानतळ बनविताना जशी खरफुटीची अडचण दुर केली जाणार आहे त्याच अनुषंगाने सदर ठिकाणचा खारफुटीचा मुददा सोडवून रखडलेली विकास कामे मंजुर करावीत व संभाव्य उपाय करुन नागरिकांना होत असलेल्या नाल्यांच्या दुर्गंधीचा त्रास कमी करावा. | 31<br>एप्रिल | 1027<br>20/04/2016 | मंजूर |
| **21.** | **श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-** माझी आई स्वर्गिय सौ. विजयाताई विनायक म्हात्रे माजी महापौर नवी मुंबई यांच्या कार्यकाळात 1996-97 मध्ये करावेगावात 8 लाख लिटर क्षमतेचे भुमिगत व 4 लाख लिटर क्षमतेचे उच्च स्तरीय जलकुंभ बांधण्यात आले असुन त्यावेळी म्हणजेच 1996-97 साली करावे नागरी आरोग्य केंद्राच्या नोंदणी नुसार 9326 एवढी लोकसंख्या होती. तसेच आज 2015-16 साली करावेनागरी आरोग्य केंद्राच्या नोंदणी नुसार करावेगावाची आजची लोकसंख्या 30,000 एवढी आहे. म्हणजेच साधारणपणे 1996-97 सालच्या तुलनेत आजची लोकसंख्या तिपट्टीने वाढलेली आहे. त्यामुळे करावे गावासाठी असलेला जलसाठा अपुरा असुन तसेच भविष्यात शासनातर्फे प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधकामे नियमित करण्याचे धोरण असुन त्यामुळे अजुन लोकसंख्या वाढणार आहे. तरी या सर्व बाबींचा विचार करता करावेगावामध्ये 10 लाख लिटर क्षमतेचे भुमिगत व 5 लाख लिटर क्षमतेचे उच्च स्तरीय जलकुंभ बांधणे. | 32<br>एप्रिल | 1028<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 22. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 54, से. 28 व 29 मधील नागरी वस्तीतुन वाहणारा एकमेव उघडा नाला असुन त्या उघडया नाल्यामुळे नाल्याच्या दोन्ही बाजूस राहणाऱ्या परिसरात डासांचा आणि घाणीचा मोठया प्रमाणात प्रार्दुभाव वाढलेला आहे. त्यामुळे तेथील नागरीकांना डेंगू, मलेरीया या सारख्या साथीच्या रोगांना सामोरे जावे लागत आहे. तरी हा उघडा नाला बंदिस्त करण्यासाठी सदर बाबत योग्य ती कार्यवाही करणे. | 33<br>एप्रिल | 1029<br>20/04/2016 | मंजूर |
| 23. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 54, से. 28 मधील डॉग केंद्र ते मलनि:स्सारण केंद्रापर्यंतच्या पदपथालगत सुलभ शौचालय (ई टॉयलेट ) उभारण्यात यावे जेणेकरुन तेथील सकाळ संध्याकाळ फेरफटका मारणारे नागरीक, वरिष्ठ रहिवाशी, खास करुन महिला वर्ग तसेच काही सोसायटीचे सुरक्षा रक्षक, घरकाम करणाऱ्या मोलकरणी यांची कुचंबना होणार नाही व इतरस्थ आडोशाला होणारी घाण न होता परिसर स्वच्छ व आरोग्यदायी राहण्यास मदत होईल तरी सदर शौचालयाची निर्मीती व्हावे. | 34<br>एप्रिल | 1030<br>20/04/2016 | मंजूर |
| 24. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 54, से. 29 मधील डायमंड गृहनिर्माण संस्था ते सिटी कॉर्नर 1 च्या पाठीमागील बाजुस 500 मिटर x 20 मिटरचा ट्रीबेल्ट असुन ट्रीबेल्ट लगत असणाऱ्या नाल्यामधुन सतत सोसायटीमध्ये येणाऱ्या विषारी सापांचा व भुरटया चोरांचा प्रार्दुभाव वाढल्याने तेथील नांगरिकांमध्ये भितीचे वातावरण तयार झालेले आहे. हा त्रास कमी होण्यासाठी नाला व ट्रीबेल्टच्या मधुन 20 x 500 मिटर लांबीची व 6 फुट उंचीची भिंत बांधणे. | 35<br>एप्रिल | 1031<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **25.** | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 33, मध्ये सिडकोने विकसित केलेल्या घणसोली विभागातील सेक्टर 1 ते सेक्टर 9 या मोठया क्षेत्रात एकही सार्वजनिक प्रसाधन गृहाची तरतूद करण्यात आलेली नसल्याने या परिसरात व्यापार उदीम, मोल मजुरी कारणास्तव येणाऱ्या आबाल वृध्द नागरिकांची, विशेषत: महिला वर्गाची कुचंबना होते. त्यामुळे याचे दुष्परिणाम स्वरुप म्हणजे परिसरात सार्वजनिक प्रसाधन गृहाची वानवा असल्याने संबंधितांकडून या ठिकाणाच्या आसपासच्या काही अविकसित मोकळया भुखंडाचा तसेच पावसाळी नाल्याकडील जागांचा वापर नैसर्गिक विधी पार पाडण्यासाठी केला जात असल्याचे दिसून येते. तरी या विषयाची नोंद घेऊन जनहितार्थ तातडीने महापालिकेला सिडकोने उद्यानासाठी दिलेल्या सेक्टर 4 आणि सेक्टर 5 मधील भुखंडाच्या कोपऱ्याकडील बाजूस सार्वजनिक सुलभ प्रसाधन गृहे बांधणे. | 36<br>एप्रिल | 1032<br>20/04/2016 | मंजूर |
| **26.** | **सौ. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेने घणसोली विभाग व्यतिरीक्त शहरात सर्व विभागांमध्ये विरंगुळा केंद्राची उभारणी केलेली आहे. त्यामुळे महापालिका हि हेतुपुर्वकतेने घणसोली विभागातील जनतेप्रती सापत्न भावाची भावना बाळगत असल्याचा नकारात्मक संदेश करदात्या जनतेमध्ये पोहचत आहे. तरी या विषयाची दखल घेऊन तातडीने महापालिकेला सिडकोने उद्यानांसाठी दिलेल्या सेक्टर 4 भुखंडावर विरुगुळा केंद्राची उभारणी करणे. | 37<br>एप्रिल | 1033<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **27.** | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागात सफाई कामगारांची संख्या कमी आहे. त्यामुळे साफसफाई योग्य प्रकारे होत नाही. गावठाण भाग असल्यामुळे गटारांची संख्या मोठया प्रमाणात आहे. लहान गटारांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे गटारांची साफसफाई होत नाही त्यामुळे मलेरिया डेंग्युचे प्रमाण नेहमीचेच आहे. शहरी भागातील सफाई कामगारांच्या संखेच्या नॉम्स प्रमाणे गावठाण व झोपडपट्टीतील सफाई कामगारांची संख्या आहे. परंतू येथील कामाचे स्वरुप वेगळे आहे. वस्तुस्थिती वेगळी आहे. गावठाण भाग व झोपडपट्टी भाग यातील प्रत्येक प्रभागाची हिच वस्तुस्थिती आहे. हिच समस्या आहे. प्रभाग क्र. 29, मधील सफाईकामगारांची संख्या 26 आहे व ती कमी आहे. ती 10 कामगारांने वाढविण्यात यावे. | 38<br>एप्रिल | 1034<br>20/04/2016 | मंजूर |
| **28.** | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 29, घणसोली 2 या प्रभागातील छत्रपती शिवाजी महाराज तलावापासून पश्चिमेकडे खाडीपर्यंत नैसर्गिक पावसाळी पाणी वाहून नेणारा नाला आहे. व सध्या हि नाल्यातून सांडपाणी वाहून जात आहे. या नाल्याच्या बाजूला तीन बावडी, म्हात्रे आळी, जयश्री नगर हि नगरे आहेत पावसाळयात या नाल्यातून मोठया प्रमाणात पाणी येत असल्यामुळे या नगरांत नेहमीच पाणी भरत असते. व येथील राहणाऱ्या नागरिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. पावसाळयात होणारी गैरसोय व नुकसान होवू नये म्हणून या नाल्याचे बांधकाम करणे. | 39<br>एप्रिल | 1035<br>20/04/2016 | मंजूर |
| **29.** | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 2, रामनगर मधील बोरला तलाव येथे जेष्ठ नागरिकांसाठी बैठकीची व्यवस्था करुन शेड बांधणे. | 40<br>एप्रिल | 1036<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 30. | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 2, रामनगर येथील अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करणे. | 41 / एप्रिल | 1037 / 20/04/2016 | मंजूर |
| 31. | **सौ. शुभांगी जगदिश गवते, यांजकडून :-** प्रभाग क्र. 2, रामनगर मधील समाजमंदिर G+2 बांधणे. | 42 / एप्रिल | 1038 / 20/04/2016 | मंजूर |
| 32. | **सौ. मनिषा शशिकात भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र.48, पावणेगांव येथील महानगरपालिका भुखंडावर रहिवाशी व एम आय डी सी विभाग साठी विभाग कार्यालय बांधणे. | 43 / एप्रिल | 1039 / 20/04/2016 | मंजूर |
| 33. | **सौ. मनिषा शशिकात भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र.48, पावणेगांव प्राथमिक शाळेमध्ये इंग्रजी सेमी इंग्रजी माध्यमची बालवाडी सुरु करणे. | 44 / एप्रिल | 1040 / 20/04/2016 | मंजूर |
| 34. | **सौ. मनिषा शशिकात भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र.48, श्रमिकनगर प्राथमिक शाळेमध्ये हिंदी माध्यमची प्राथमिक पुर्व प्राथमिक वर्ग सुरु करणे. | 45 / एप्रिल | 1041 / 20/04/2016 | मंजूर |
| 35. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, मधील राधाकृष्ण मंदिराजवळची व आनंद भवन ते यशवंत महादू भोईर निवास येथील कमी व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी काढून तेथे मोठया व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी बसविणे व तेथील फुटपाथची दुरुस्ती करुन तेथे इंटरलॉक बसविणे. | 46 / एप्रिल | 1042 / 20/04/2016 | मंजूर |
| 36. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, से. 10 वाशी नवी मुंबई येथील श्रध्दा अपार्टमेंट येथील फुटपाथची दुरुस्ती करुन तेथे इंटरलॉक बसविणे. | 47 / एप्रिल | 1043 / 20/04/2016 | मंजूर |
| 37. | **श्री. हरिश्चंद्र आत्माराम भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 59, जुहूगांव-2, से. 11 वाशी नवी मुंबई येथील गावदेवी मद्यानातील बठक स्टँडची दुरुस्ती करुन त्यावर शेड बसविणे. | 48 / एप्रिल | 1044 / 20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 38. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक 39 हनुमाननगर(महापे) व शाळा क्र. 41 अडवली-भुतावळी या शाळेमध्ये प्रयोगशाळा चालू करणे. | 49<br>एप्रिल | 1045<br>20/04/2016 | मंजूर |
| 39. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, महापे अडवली भुतावळी गाव येथील श्रीमती अनुसया तबाले यांच्या घरापासुन ते श्री नरेंद्र खुलात चाळ पर्यंत जुने खुले गटार असुन त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे त्यामुळे गटारातील घाण पाणी रस्त्यावर येते. त्यामुळे तेथील रहिवाशांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तरी तेथे नवीन बंदिस्त गटार बांधणे. | 50<br>एप्रिल | 1046<br>20/04/2016 | मंजूर |
| 40. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.79, शांतीवन सोसायटी सेक्टर 7 सानपाडा ते जुईनगर रेल्वे ट्रक दरम्यान रस्ता दुभाजकावर पाबॉलीक कब स्टोन बसविणे. | 51<br>एप्रिल | 1047<br>20/04/2016 | मंजूर |
| 41. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.79, कै सिताराम मास्तर उद्यान सेक्टर 7 सानपाडा येथे ओपन जिम संकल्पना राबविणे. | 52<br>एप्रिल | 1048<br>20/04/2016 | मंजूर |
| 42. | **श्रीम. ऋचा रामचंद्र पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र.79, भुखंड क्र. 1, सेक्टर 11 सानपाडा ते भुखंड क्र. 11 सेक्टर 11 सानपाडा मागील बाजूस नाल्याला लागून रस्ता बनविणे. | 53<br>एप्रिल | 1049<br>20/04/2016 | मंजूर |
| 43. | **सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 94, सेक्टर 10, नेरुळ येथील साईबाबा हॉटेल ते गुडविल आर्केडपर्यंत (नेरुळ स्टेशन रोड) सिडकोची मलनि:स्सारण वाहिनी सिडको कालीन आहे तरी ती नव्याने मोठी टाकणे. | 54<br>एप्रिल | 1050<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **44.** | **सौ. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 94, सेक्टर 10, येथील नागरी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून व कायदा सुव्यवस्थेस सहकार्य होण्यासाठी साईबाबा हॉटेल ते स्टेशन रोड व ह.भ.प.कोंडाजी बाबा डेरे मार्ग, ते शिवशक्ती अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्यालगत असणाऱ्या विजेच्या खांबावर सी.सी.टी.व्ही. (CCTV) कॅमेरे बसविणे. | 55<br>एप्रिल | 1051<br>20/04/2016 | मंजूर |
| **45.** | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, सेक्टर 16, नेरुळ मधील संभाजीराजे उद्यानातील गेट आणि संरक्षक भिंत तुटलेली असल्यामुळे भटकी कुत्री मोठया प्रमाणावर शिरकाव करुन उद्यानात खेळत असलेल्या मुलांच्या व त्यांच्या पालकांवर भुंकुन अंगावर धावून जातात. काही वेळा तर ते कुत्रे काही नागरिकांना चावले ही आहेत. तसेच रात्री, अपरात्री काही समाजकंटक नशा करण्यासाठी उद्यानात येतात त्यामुळे स्थानिक नागरिकांनी याबाबत माझ्याकडे लेखी तक्रारही केली आहे तरी आपण लहान मुले व त्यांच्या पालकांची सुरक्षितता लक्षात घेऊन संभाजीराजे उद्यानात सुरक्षा रक्षक नेमणे. | 56<br>एप्रिल | 1052<br>20/04/2016 | मंजूर |
| **46.** | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, सेक्टर 18, नेरुळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान व आसाराम बापू उद्यान येथे आसन व्यवस्था व छोटी खेळणी बसविणे. | 57<br>एप्रिल | 1053<br>20/04/2016 | मंजूर |
| **47.** | **सौ. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, सेक्टर 16 ए, नेरुळ येथील मिनाताई ठाकरे मैदानाची आतील जागा लेवल मध्ये नसल्यामुळे व आतील पाणी बाहेर जाण्याकरीता छोटे गटार नसल्यामुळे पावसाचे पाणी तेथेच तुंबुन राहते त्यामुळे तेथे चिखल होऊन डास व मच्छरांची पैदास होते. तरी आपण सदर मैदानाच्या आतमध्ये संरक्षक भिंतीच्या शेजारी छोटी गटारे बांधणे. | 58<br>एप्रिल | 1054<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 48. | **सौ. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 76, सानपाडा पोलिस ठाणे ते सिध्दीविनायक को.ऑ.हौ.सो सेक्टर 8, समोरील रस्ता डांबरीकरण करणे. | 59<br>एप्रिल | 1055<br>20/04/2016 | मंजूर |
| 49. | **सौ. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 76, सानपाडा रेल्वे स्टेशन सेक्टर 3 ते सानपाडा ओव्हर ब्रिज सेक्टर 8, पर्यंत रेल्वेट्रॅकच्या बाजूला F.R.P. ग्रील बसविणे. | 60<br>एप्रिल | 1056<br>20/04/2016 | मंजूर |
| 50. | **सौ. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 76, मध्ये संपुर्ण रस्त्यांना मार्गदर्शक फलक बसविणे. | 61<br>एप्रिल | 1057<br>20/04/2016 | मंजूर |
| 51. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, मध्ये एम.एस.ई.बी., एम.टी.एन.एल तसेच महानगरपालिका यांनी बऱ्याच ठिकाणी प्रभागामधील रस्त्यामध्ये खोदकाम केल्याने सदर रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. तरी सदर प्रभागातील संपुर्ण रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 62<br>एप्रिल | 1058<br>20/04/2016 | मंजूर |
| 52. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45 मधील बस डेपोची झालेली दुरावस्था पाहता सदर बस डेपोमध्ये संपुर्ण रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण करण्याची गरज आहे तरी सदर बस डेपोचे कॉंक्रिटीकरण व मुख्य प्रवेशद्वार ही कामे करणे. | 63<br>एप्रिल | 1059<br>20/04/2016 | मंजूर |
| 53. | **सौ. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 45, सेक्टर 3 मधील मोकळया भुखंडावर नागरिकांच्या सोयीसाठी व्यायामशाळा व बहुउददेशीय इमारत बांधणे. | 64<br>एप्रिल | 1060<br>20/04/2016 | मंजूर |
| 54. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्रभाग क्र. 55, भुखंड क्र. 25, सेक्टर 11 येथे क्रिकेट मद्यान विकसीत करणे. | 65<br>एप्रिल | 1061<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **55.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्रभाग क्र. 55, सेक्टर 11, भुखंड क्र. 19 सी व 19 सी-1 या भुखंडावर इन्डोअर स्टेडीयम, स्विमिंग पुल तसेच व्यायामशाळा बांधणे. | 66 / एप्रिल | 1062 / 20/04/2016 | मंजूर |
| **56.** | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** प्रभाग क्र. 55, खारणे गांव येथील दफनभुमीमध्ये पेव्हर ब्लॉक इंटरलॉक बसवून पदपथाचे बांधकाम करणे. | 67 / एप्रिल | 1063 / 20/04/2016 | मंजूर |
| **57.** | **डॉ. जयाजी के नाथ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 104, सी.बी.डी. बेलापूर मधून जाणाऱ्या मध्यवर्ती नाल्याची गेल्या 10 वर्षापासून दुरुस्ती झालेली नसल्यामुळे सदरच्या भागामध्ये भरपूर पाणी व दुर्गंधीचे साम्राज्य पसरलेले आहे. तरी सदरच्या नाल्यामध्ये होणारे मच्छर व दुर्गंधी पासुन मुक्तता मिळवी याकरीता नाल्याची दुरुस्ती करुन दोन्ही बाजूच्या भिंती वाढवून सुशोभिकरण करणे. | 68 / एप्रिल | 1064 / 20/04/2016 | मंजूर |
| **58.** | **डॉ. जयाजी के नाथ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 104, मध्ये अनेक नागरिकांची मागणी असून नव्या मुंबईतील नागरिकाचे स्वास्थ चांगले राहण्यासाठी सेक्टर 4,5,6 व 8बी मधील उद्यानामध्ये ओपन जिमचे साहित्य बसविणे. | 69 / एप्रिल | 1065 / 20/04/2016 | मंजूर |
| **59.** | **डॉ. जयाजी के नाथ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 104, मध्ये सेक्टर 4,5,6 व 8बी मधील नागरिकांची गेल्या अनेक वर्षाची लायन्स पार्क मध्ये विरंगुळा केंद्र बांधण्यासाठी मागणी असून तेथे विरंगुळा केंद्र बांधून जेष्ठ नागरिकांना दिलासा द्यावा. | 70 / एप्रिल | 1066 / 20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 60. | **श्री. दिपक रघुनाथ पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 107, सेक्टर 15 सी.बी.डी. येथे सिनियर सिटीझन यांची सेफ वॉक संस्था असुन सदर संस्था विविध समाजपयोगी कार्यक्रम करत असते. या संस्थेमार्फत समाजातील विविध वयोवृध्द व्यक्ती सकाळी व संध्याकाळी जॉगींग करण्याकरीता तसेच मनोरंजनाकरीता येत असतात. सदर ठिकाणी नवी मुंबईच्या भुषणात एक मानाचा तुरा म्हणून कॉमन मॅन चा पुतळा उभारणे. | 71<br>एप्रिल | 1067<br>20/04/2016 | मंजूर |
| 61. | **श्री. दिपक रघुनाथ पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 107, सेक्टर 15 सी.बी.डी. बेलापूर येथे वन टाईम प्लॅनिंग अंतर्गत बनविण्यात आलेल्या रस्त्यावर वाहनांची वर्दळ व वेग जास्त असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर रस्त्यावर विविध ठिकाणी स्पीड ब्रेकर्स बसविणे. | 72<br>एप्रिल | 1068<br>20/04/2016 | मंजूर |
| 62. | **श्री. दिपक रघुनाथ पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 107, मधील सेक्टर 15 सी.बी.डी. बेलापूर मध्ये जॉगर्स पार्क येथे सिनियर सिटीझन यांना बसण्यासाठी बेंचेस बसविणे. | 73<br>एप्रिल | 1069<br>20/04/2016 | मंजूर |
| 63. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गावातील ग्रामस्थांसाठी व रहिवाशांसाठी स्वंतत्र नवीन स्मशानभुमी बनविणे. | 74<br>एप्रिल | 1070<br>20/04/2016 | मंजूर |
| 64. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गाव उडडाण पुलाखालील समाज मंदिरामध्ये स्टेजच्या डाव्या व उजव्या बाजुला दोन खोल्या (चेंजिग रुमर्स) बनविणे. | 75<br>एप्रिल | 1071<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 65. | **सौ. सरोज रोहिदास पाटील, यांजकडून :-** प्रभाग क्र. 101, मधील आग्रोळी गावाजवळील सेक्टर 30 व 31 मधील भुखंड क्र. 14 हा मद्यानासाठी आरक्षित असलेला भुखंड सिडकोकडुन नवी मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरित करुन घेवुन सदर मद्यानाचे सपाटीकरण (समपातळी) करुन मद्यानाचा विकास करणे. | 76<br>एप्रिल | 1072<br>20/04/2016 | मंजूर |
| 66. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 49, सेक्टर 9 व 10 येथे ओपन जिमसाठी जागा उपलब्ध करुन जिम चालु करणे. | 77<br>एप्रिल | 1073<br>20/04/2016 | मंजूर |
| 67. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 49, मध्ये अद्यावत वाचनालय अभ्यासिका उभारणे. | 78<br>एप्रिल | 1074<br>20/04/2016 | मंजूर |
| 68. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 49, मध्ये सर्व रस्त्यावर सी.सी.टि.व्ही कमेरे बसविणे. | 79<br>एप्रिल | 1075<br>20/04/2016 | मंजूर |
| 69. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सीबीडी, सेक्टर 8 आर्टिस व्हिलेज येथे मोठया प्रमाणात वाहन पार्किगची गइसोय असून त्वरित नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सोय करणे. | 80<br>एप्रिल | 1076<br>20/04/2016 | मंजूर |
| 70. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सीबीडी, सेक्टर 8 आणि 8 मध्ये डोंगरांच्या बाजूस असल्यामुळे चोरीमाऱ्याचा मोठया त्रास होत आहे. म्हणून संरक्षक भिंत बांधणे. | 81<br>एप्रिल | 1077<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 71. | **सौ. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 103, सीबीडी, सेक्टर 8 मधील झोपडपटटीमध्ये मोठया प्रमाणात नवीन झोपडी वाढत असून प्रशासनाच्या निदर्शनास देऊन सुध्दा आतापर्यंत कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही म्हणून शासनाच्या नियमाप्रमाणे असलेल्या झोपडयांना संरक्षक भिंत बांधणे. | 82<br>एप्रिल | 1078<br>20/04/2016 | मंजूर |
| 72. | **श्री. द्वारकानाथ बाबू भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 30, मधील तळवली येथील स्मशानभुमीची दुरुस्ती करणे. | 83<br>एप्रिल | 1079<br>20/04/2016 | मंजूर |
| 73. | **श्री. द्वारकानाथ बाबू भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 30, मधील तळवली येथील साई एकविरा चाळ येथील पदपथ व गटारावर कॉंक्रिट स्लॅब टाकणे. | 84<br>एप्रिल | 1080<br>20/04/2016 | मंजूर |
| 74. | **श्री. द्वारकानाथ बाबू भोईर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 30, घणसोली मधील सेक्टर 15 व 16 येथील रस्ता आगरी चौक, वैशाली बिल्डींग ते भुमीराज सोसायटी पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 85<br>एप्रिल | 1081<br>20/04/2016 | मंजूर |
| 75. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 38, कोपरखैरणे, येथील सर्व रस्त्यांवर संपूर्ण खडडे पडले असल्याने पावसाळया आधी सर्व रस्त्यांवरील खडडे बुजवून त्यावर गतिरोधक टाकणे. | 86<br>एप्रिल | 1082<br>20/04/2016 | मंजूर |
| 76. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 38, मध्ये 1 टॅक्सी स्टॅड व 1 रिक्षा स्टॅड आहेत, सदर ठिकाणी अनधिकृत स्टॉल आहेत ते हटवून त्याचे सुशोभिकरण करणे. | 87<br>एप्रिल | 1083<br>20/04/2016 | मंजूर |
| 77. | **श्रीम. मेघाली मधुकर राऊत, यांजकडून :-** प्रभाग क्र. 38, मध्ये छोटे खानी हॉकर्स झोन (भाजीमार्केट) आहे तो विकसित करणे. | 88<br>एप्रिल | 1084<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 78. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12 सेक्टर 2 या ठिकाणी ज्ञानदिप शाळेच्या मागील बाजूस असलेले उद्यान तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान मध्ये पाण्याची कमतरता असल्यामुळे 2 बोरिंगची पाण्यची स्टोरेज व्यवस्था करुन देणे. | 89<br>एप्रिल | 1085<br>20/04/2016 | मंजूर |
| 79. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12 सेक्टर 2 मध्ये सदर ठिकाणी 2 हायमास्टची व्यवस्था करणे. | 90<br>एप्रिल | 1086<br>20/04/2016 | मंजूर |
| 80. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 12 सेक्टर 2 या ठिकाणी प्रतिभा सोसायटी लगतच्या मोकळया भुखंडावर महिलांसाठी महिला उद्योग भवन स्थापन करणे. | 91<br>एप्रिल | 1087<br>20/04/2016 | मंजूर |
| 81. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37 मधील प्लॉट नं. 34 ते 37 पर्यंत असलेल्या पदपथांची दुरूस्ती करणे. | 92<br>एप्रिल | 1088<br>20/04/2016 | मंजूर |
| 82. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37 मधील प्लॉट नं. 48 ते 49 सनी टॉवर समोरील गटर हेवी डयूटी वर बनविणे. | 93<br>एप्रिल | 1089<br>20/04/2016 | मंजूर |
| 83. | **सौ. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 37 मधील सेक्टर-1, प्लॉट नं. 83 आर्शिवाद कॉम्प्लेक्स समोरील पदपथांची दुरूस्ती करणे. | 94<br>एप्रिल | 1090<br>20/04/2016 | मंजूर |
| 84. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51, सेक्टर -12 व 10 च्या मधोमध असणा-या कृष्णा सोसायटीच्या बाजूला असलेला नाला बंदिस्त करून त्याच्यावर गार्डन किंवा पार्किगची व्यवस्था करणे. | 95<br>एप्रिल | 1091<br>20/04/2016 | मंजूर |
| 85. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-** प्रभाग क्र. 51, मध्ये मयूर अपार्टमेंट सोसा., ते महाराष्ट्र को.ऑ. बँक पर्यत हेवी डयुटी गटर बांधणे. | 96<br>एप्रिल | 1092<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 86. | **सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-** प्रभाग क्र. 91 मधील गुरुनानक उद्यानातील जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रची दुरावस्था झालेली आहे. सदरचे जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची इमारत तोडून कल्पना चावला उद्यान किंवा गुरुनानक उद्यानातील नविन जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राची इमारत उभारणे. | 97<br>एप्रिल | 1093<br>20/04/2016 | मंजूर |
| 87. | **सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-** प्रभाग क्र. 91 मधील सेक्टर-13, 17, 19 व 21 येथील चौकांचे कॉक्रीटीकरण करण्यात यावे. तसेच प्रभागातील सर्कल यांचे सुशोभिकरण करणे. | 98<br>एप्रिल | 1094<br>20/04/2016 | मंजूर |
| 88. | **सौ. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-** "पारसिक हिल या ठिकाणी जेष्ठ नागरिक व वाकर्स हे फेरफटका मारण्यासाठी सकाळच्या वेळेस जातात. काही वेळेस याठिकाणी त्यांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमासाठी या ठिकाणी ॲम्पी थिएटर बांधण्यात यावे | 99<br>एप्रिल | 1095<br>20/04/2016 | मागे घेतला |
| 89. | **सौ. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 52 मध्ये डी मार्ट सिग्नल ते जामा मस्जिद या रोडवरील गटर हेवी डयुटी करुन रस्ता रुंदीकरण करणे. | 100<br>एप्रिल | 1096<br>20/04/2016 | मंजूर |
| 90. | **सौ. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 52, सेक्टर-15 येथील रो हाऊस प्लॉट नं. 57 ते 69 या समोरील गटर हेवी डयुटी करून रस्ता रुंदीकरण करणे. | 101<br>एप्रिल | 1097<br>20/04/2016 | मंजूर |
| 91. | **सौ. निर्मला आनंदराव कचरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 52, क्लासिक स्कायलार्क प्लॉट नं. 21 ते सेक्टर-15 गार्डन मधील जाणा-या रोडवरील गटर हेवी डयुटी करुन तसेच रस्ता रुदीकरण करुन करणे. | 102<br>एप्रिल | 1098<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 92. | **सौ. पुजा गणेश मेढकर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 71 मध्ये बगाडे परिसर येथील रमेश सुर्यवंशी यांच्या घरापासून ते रवी पाटवळे यांच्या घरापर्यंत गटारे व पदपथ सुधारणे. | 103<br>एप्रिल | 1099<br>20/04/2016 | मंजूर |
| 93. | **सौ. पुजा गणेश मेढकर, यांजकडून :-** प्रभाग क्र.71 मध्ये हनूमान नगर येथील अंबाबी जनरल स्टोअर्स ते क्ाओकारसिंग धर्माजी मेढ़कर शाळेपर्यतची गटारांची सुधारणे. | 104<br>एप्रिल | 1100<br>20/04/2016 | मंजूर |
| 94. | **सौ. पुजा गणेश मेढकर, यांजकडून :-** प्रभाग क्र. 71, मध्ये हनूमान नगर येथील संजीवनी क्लॉरी येथिल परिसरातील पदपथाची सुधारणे. | 105<br>एप्रिल | 1101<br>20/04/2016 | मंजूर |
| 95. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-** आरोग्याशी निगडीत असल्याने मच्छरांसाठी संध्याकाळी फोगिंग / फवारणी कायम स्वरुपात करणे. | 106<br>एप्रिल | 1102<br>20/04/2016 | मंजूर |
| 96. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-** प्रभाग क्र. 62 मधील सेंट लॉरेंस शाळेनजीक असलेला नाळा जो बंदिस्त करणे. | 107<br>एप्रिल | 1103<br>20/04/2016 | मंजूर |
| 97. | **सौ. अंजली अजय वाळुंज, यांजकडून :-** प्रभाग क्र. 62 मधील सर्व उद्यानामध्ये बोअरवेलची व्यवस्था करणे. | 108<br>एप्रिल | 1104<br>20/04/2016 | मंजूर |
| 98. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97 नेरुळ, सेक्टर-18 येथील यशवंत शिंदे मार्ग, विद्याभवन शाळेसमोरील पदपाथ बरेच ठिकाणी उखडली गेली आहेत तसेच त्याच्या वरच्या गटाराची झाकणे तुटली आहेत तरी त्याची त्वरीत दुरूस्ती करणे. | 109<br>एप्रिल | 1105<br>20/04/2016 | मंजूर |
| 99. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97, नेरुळ, सेक्टर-18 येथील दिपसागर सोसायटीच्या समोरच्या गटाराची लोखंडी जाळी चोरीस गेलेली आहे तरी त्याच्यावर नवीन जाळी तातडीने बसविणे. | 110<br>एप्रिल | 1106<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 100. | **श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-** प्रभाग क्र. 97 नेरुळ, सेक्टर-18ए मधील हषा बाल्या ठाकूर उद्यानामध्ये संध्याकाळ नंतर अंधार झाल्यावर काही गर्दुले तेथे चरस, गांज्या करण्यासाठी तसेच काही तरूण दारू पिण्यासाठी उद्यानामध्ये बसतात त्याचा उद्यानाच्या आजूबाजूला राहणा-या रहिवाशांना त्या गोष्टीचा त्रास सहन करावा लागत असल्याकारणाने सदर उद्यानामध्ये चांगले विद्युत दिवे लावणे. | 111<br>एप्रिल | 1107<br>20/04/2016 | मंजूर |
| 101. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील क्ाअण्णासाहेब पाटील उद्यान सुशोभिकरण करणे. | 112<br>एप्रिल | 1108<br>20/04/2016 | मंजूर |
| 102. | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील सेव्हरेज लाईन (मलनि:स्सारण वाहिन्या) बदलणे. | 113<br>एप्रिल | 1109<br>20/04/2016 | मंजूर |
| 103 | **सौ. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-** प्रभाग क्र. 47 मधील क्ाअण्णासाहेब पाटील उद्यानात बहुउद्देशिय इमारत बांधणे. | 114<br>एप्रिल | 1110<br>20/04/2016 | मंजूर |
| 104 | **श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-** प्रभाग क्र. 43 मधील से.18, रूम नं.757 ते 813 समोरील गटारांवर हेवी डयुटी करण्यात यावे. | 115<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 105. | **श्रीम. दमयंती बबन आचरे, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 43 मधील से.17 रुम नं. 833 ते 757 समोरील गटारावर हेवी डयुटी करण्यात यावे | 116<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 106. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 28 अंतर्गत सर्व स्ट्रीट लाईट बदलून तेथे नवीन एल.ई.डी दिवे लावण्यात यावेत व जूने खराब झालेले डि.पी बॉक्स बदलून नवीन बॉक्स लावण्यात यावे. | 117<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 107. | **सौ. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 28 अंतर्गत पावसाळया पुर्वीची सर्व कामे करण्यात यावीत. उदा. तलाव, विहीरी, नाले, गटार यांची सफाई करण्यात यावी. | 118<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 108. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 27 अंतर्गत घणसोली गावाच्या सुरुवातीला अर्जूनवाडीजवळ असलेल्या नाल्याची पावसाळयापूर्वी साफसफाई करण्यात यावी. | 119<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 109. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 27 मधील नाल्यावर एम.एस.ई.बी च्या ट्रान्सफार्मर आहे त्या ट्रान्सफार्मर भोवती सुरक्षा भिंत बांधण्यात यावी. | 120<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 110. | **श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-** "प्रभाग क्र. 27 पावसाळयापुर्वी प्रभागातील एम.एस.सी.बी दिवे बदलून एल.ई.डी दिवे लावण्यात यावे. | 121<br>एप्रिल | 20/04/2016 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 111. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35 मध्ये असलेल्या शाळेचे मद्यान भूखंड क्र.6 मद्यानाचा विकास करुन संरक्षक भिंत व भव्य व्यासपीट बांधणे. | 122<br>एप्रिल | 1111<br>20/04/2016 | मंजूर |
| 112. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35 घणसोली मधील नागरी वसाहत क्षेत्राला लागुन वाहणा-या मोठया नाल्यालगत नागरीकांसाठी जॉगींग ट्रक्र करणे. | 123<br>एप्रिल | 1112<br>20/04/2016 | मंजूर |
| 113. | **सौ. दिपाली सुरेश संकपाळ, यांजकडून :-** प्रभाग क्र. 35 घणसोली वसाहतीला लागुन असणा-या मोठया नाल्यामध्ये असणारा गाळ काढून साफसफाई करावी व नाल्याची पुर्नबांधणी करून त्या नाल्यालगत संरक्षक भिंत उभारणे. | 124<br>एप्रिल | 1113<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 114. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 95 मधील कै। पंडित रामा भगत उद्यानामध्ये विरंगुळा केंद्र बांधणे. | 125<br>एप्रिल | 1114<br>20/04/2016 | मंजूर |
| 115. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 95 मधील मुख्य चौकांमध्ये LED फ्लड लाईट लावणे. | 126<br>एप्रिल | 1115<br>20/04/2016 | मंजूर |
| 116. | **श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 95 मधील तेरणा शाळे समोरील दुभागीय रस्ता पुढे जाउन गावदेवी मंदिरासमोर एकेरी होतो. सदर ठिकाणी श्रीम. अनुसया बाबुराव पाटील यांचे ग्रामपंचायत कालीन जुने घर असून हे रस्त्यामध्ये 20 मीटर रुंदी पर्यंत आल्याने सद्यस्थितीत रहदारीसाठी फक्त 10 मीटर रूंदीचा रस्ता उपलब्ध आहे. तरी, श्रीम. अनुसया बाबुराव पाटील यांना सदर घराबाबत पर्यायी भूखंड देण्यात येवून सदर रस्त्याची जागा मोकळी करावी म्हणजे महानगरपालिकेला रस्त्याचे काम करणे. | 127<br>एप्रिल | 1116<br>20/04/2016 | मंजूर |
| 117. | **श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून :-**<br>महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी 31 डिसेंबर 2015 पर्यंतची घरे अधिकृत असे जाहीर केले असताना, नवी मुंबई महानगरपालिका गावठाण व सिडको भागातील वाढीव बांधकांमाना चौपट करपात्र मुल्य आकारत असून सदर महानगरपालिकेची भुमिका येथील नागरिकांवर अन्यायकारक असून सदर वाढीव करपात्र मुल्य एकपट करणे. | 128<br>एप्रिल | 1117<br>20/04/2016 | मंजूर |
| 118. | **श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून :-**<br>मोबाईल टॉवरच्या रेडिएशनचा त्रास होऊ नये म्हणून शाळा, कॉलेज हॉस्पीटल यापासून मोबाईल टॉवर 300 मिटर दुर लावणेबाबत व नवी मुंबई मानगरपालिका क्षेत्रातील सर्व अनधिकृत मोबाईल टॉवर हटविणे. | 129<br>एप्रिल | 1118<br>20/04/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 119. | **श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून :-**<br>महानगरपालिका व खाजगी शिक्षण संस्था यांच्या उदासिनतेमुळे शिक्षण हक्क (RTE) कायद्याची अंमलबजावणी होत नाही त्यामुळे खाजगी शाळेत 25% प्रवेश गोर गरिब आर्थिकदृष्टया विद्यार्थ्यांना मिळत नाही, म्हणून सदर शिक्षण हक्क कायदा (RTE) विषय माहिती नवी मुंबई शिक्षण मंडळ मार्फत प्रचार व प्रसार करणे. | 130<br>एप्रिल | 1119<br>20/04/2016 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका**